Golden Research Thoughts
International Recognition Multidisciplinary Research Journal

ISSN 2231-5063 Impact Factor :3.4052(UIF) Volume - 5 | Issue - 9 | March- 2016

धुळे जिल्ह्यातील बलसाणे येथील मंदीरे

Baviskar Anil Vitthal
Assistant Professor, Dept Of History,
V.V.M Arts & Commerce college, Akkalkua Dist. Nandurbar.

सारांश -

□न्देशातील हेमांडपती मंदिराचा समुह बलसाणे येथे आहे. धुळे जिल्ह्यातील बुराई नदीच्या उत्तर काठावर बलसा□ □ाव वसलेले आहे. या बलसाणे गावालगतच प्राचीन नऊ वास्तु असून त्यापैकी आठ मंदिरे आ□ एक मठ आहे. या मठाच्या जवळ कोरीवकाम केलेले स्तंभ आहेत. त्रिमुख मंदिर आज भग्नावस्थेत आहे. या मंदिराचे प्रवेशद्वार देखणे आहे. बलसाणे गावाच्या पूर्वेकडील उंच भागावर चार मंदिरे असून त्यापासुन थोड्या अंतरावर मठ आहे. त्याचप्रमाणे गावाच्या वायव्य दिशेला तिन मंदिर आहे. या मंदिर समुहात मठ व प्राचीन मंदिराचा समूह बलसाणे गावाच्या परिसरात आपणास पहावयास मिळतो. या मंदिरांची वैशिष्ट्ये म्हणजे तिन मंदिरांचे मंदिर, मंडप, शिव, विष्णू व पार्वती देवतांना वाहिलेले मंदिर, मंदिरात शिवलिंग, दरवाज्यावरील भागात गणेश मूर्ती, नक्षीकाम केलेली दवाजे. देवतांच्या मूर्ती बरोबर इतर प्रतिमा कोरलेल्या आहेत. त्याचप्रमाणे या परिसरातील मंदिरांचे दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे चौकोनी आकाराचे मंडप, स्तंभ आणि शिखर होय. हे शिखर अंबरनाथ येथील मंदिराच्या शिखर रचनेप्रमाणे आहे.

प्रस्तावना -

दख्खन पठाराच्या अति उत्तरेस असलेल्या आणि महाराष्ट्र राज्यात समाविष्टे असलेल्या भू भाग म्हणजे खान्देश होय. मध्ययु□ीन खानदेशाची विभागणी जळगांव आणि धुळे जिल्ह्यात झालेली आहे.

□ानदेश या नावाचे मुळ शोधण्याचे प्रयत्न आजवर अनेक संशोधकांनी केलेले आहे. 'खांडवन, स्कंददेश, □ान्हदेश, □ान□देश, खानाचा देश' अशा विविध प्रकारची नावांची उत्पत्ती सांगण्याचा प्रयत्न केला आहे.[1]

□ानदेशास पूर्वी शेऊणदेश या नावाने ओळखले जात असे. यादव घराण्यातील राजा शेऊणचंद्र याने खानदेशवर राज्य केले. शेऊणचंद्र या राजाच्या नावाने या प्रदेशाची ख्याती सर्वत्र पसरली या प्रदेशाचे शेऊणदेश हे नाव फारुकी सुलतानाच्या खान या उपाधीवरून रुढ होईपर्यंत प्रचलित होते.[2]

इ.स. 1906 मध्ये खानदेश जिल्ह्याचे पूर्व खानदेश आणि पश्चिम खानदेश असे विभाजन करण्यात आले. पूर्व खानदेशाचे जळगांव तर पश्चिम खानदेशचे मुख्यालय धुळे येथे ठेवण्यात आले. पुढे 1906 मध्ये पूर्व खानदेश ऐवजी जळगांव जिल्हा आणि पश्चिम खानदेश ऐवजी धुळे जिल्हा असे नामकरण करण्यात आले.[3]

उद्देश - 1) बलसा□ परिसरातील मंदिरांची माहिती.

2) बलसाणे परिसरातील मंदिराची रचना या बद्दल माहिती मिळविणे.

विषय विवेचन :

भारतीय जीवनाचे दर्शन आध्यत्मिक आहे. दर्शनिक विचार धर्मावर आधारलेले आहेत. अशा प्रकारे दर्शनाचा धर्माशी घनिष्ठ संबंध आहे आणि प्रत्यक्ष अभिव्यक्ति मूर्ती व मंदीरातून होते. मंदीराचे पर्यायी शब्द प्राचीन ग्रंथात वापरलेले दिसून येतात. उदा.देवालय, देवगृह, देवातयेतन, देवस्थान आदि या सर्व शब्दांवरुन देवतांचे निवासस्थानाचा बोध होतो. म्हणून मंदीरांना देवतांचे निवासस्थान मानले जाते. मंदीरांचा सर्व प्रथम उल्लेख शतपथ ब्राह्मण ग्रंथात मिळतो.[4]

धर्म ही भारतीय जनसामान्यांच्या जीवनाची आधार राहीला आहे. भारतात बौद्ध,जैन व वैदीक धर्माचा विस्तार झाला. धर्माच्या प्रसारासोबत धार्मिक अनुष्ठानासाठी बौद्ध, जैन व वैदीक धर्माच्या अनुयायांनी आपला धर्म युगानुयु□ अमर रहावा यासाठी स्थायी वास्तूचा निर्मीती करण्याचा विचार केला. यातूनच स्तूप व मंदीरे उभारण्यात आली.[5] मंदिर उभारण्याची परंपरा बहूदा गुप्त घराण्याचा संस्थापक श्री गुप्त यांनी सुरु केली. भारतावर राज्य करणाज्या सर्व राजपरिवारांनी मंदिरे उभारण्यास सढळ हाताने मदत केली. मंदिर उभारणीच्या कार्यात एका राजघराण्यापेक्षा दुसज्या राजघराण्याने एकाहून एक भव्य अशी मंदिरे उभारली अशाच प्रकारची मंदिरे व शिल्पे धुळे जिल्ह्यातील बलसाणे येथे आपणास पहावयास मिळतात. भारतात मंदिर स्थापत्याच्या अनेक शैली विकसित झाल्यात परंतु शिल्पशास्त्रानुसार मंदिराच्या तीन श्रेण्या असून त्यात प्रामुख्याने नागर, द्रविड आणि बेसर, तसेच काही प्रादेशिक शैलीने विकसित होत गेल्या. यामध्ये यादवकाळापासून हेमांडपंती शैली प्रसिद्ध झाली. हेमाडपंती शैली यादव घराण्यातील महादेव यादव आणि रामदेवराय यादव यांचा मंत्री हेमांद्री किंवा हेमाडपंत यांच्या नावावरुन रुढ झ□ाली. हेमाडपंतांनी अनेक नवीन मंदिरे बांधून, जून्या मंदिरांचा जीर्णोद्धार केला.[7] हेमाडपंती शैली नागर व द्रविड शैलीपेक्षा काही प्रमाणात भिन्न असून तिच्यात स्थानिक वैशिष्ट्यांचाही समावेश झालेला दिसून येतो. मंदिर बांधणीसाठी चतुरस्त आणि वृत्त असा आराखडा तयार करुन म्हणजेच घडण करुन वापरत. या प्रकारच्या बांधकामासाठी म्हणजेच दगड सांधण्यासाठी चुना व माती यांचा वापर केलेला नाही. दगडांची घडण करुन दगडांना खाचा पाडून एकावर एक दगड रचून मंदिराचे विभाग रचले जात असत.[8] या मंदिर रचनेच्या पद्धतीमुळे या मंदिराविषयी एक दंतकथा सांगितली जाते की, ही मंदिरे पांडवांनी एका रात्रीतून त्यांच्या वनवासाच्या काळात बांधली. खानदेशातील अशीही हेमाडपंथी मंदिर आहेत. त्यांचा कालखंड साधारणतः दहावे ते बारावे शतकाचा आहे. या काळात यादवांच्या मांडलिकांचे खानदेशावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष राज्य असावे.[9]

□ानदेशातील हेमाडपंती मंदीरांचा एक समूह धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील बलसाणे येथे आहे. खानदेशातील प्राचीन मंदीरापैकी काही मंदीरे या समुहात आहेत. बलसाणे हे गाव धुळ्यापासून 56 कि.मी. अंतरावर आहे. बुराई नाल्याच्या काठावर हा मंदीराचा समूह आहे. एकूण नऊ मंदिरे असावेत त्यात प्रामुख्याने 8 मंदिरे व 1 मठ आहे. आज त्यापैकी 6 मंदिरे पहावयास मिळतात. बलसाणे गावाच्या वायव्य दिशेला शेतात तिन मंदीरे, गावाच्या पूर्वेकडे असलेल्या उंच भागावर चार मंदीरे असून त्या मंदीरापासून थोड्या अंतरावर मठ आहे. दोन पूर्णत नष्ट झालेली आहेत. बलसाणे परिसरातील मंदीराबद्दलची माहिती या लेखात देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

बलसाणे येथील मंदिर परीसरात मठाजवळ कोरिव काम केलेले स्तंभ असून पंचलिंग आणि ब्रह्मा या देवतांच्या मूर्त्या आहेत.[10] या मंदिर समुहापैकी दोन मंदिर समोरासमोर असून बाकीची सरळ रेषेत आहे.[11] दोन्ही मंदिरे पश्चिममुखी असून तिसज्या मंदिरेचे मुख पूर्वेलाअसून या मंदिर समुहातील सर्वात मोठ्या मंदिरापैकी सुंदर व आकर्षक असलेले मोठे मंदिर हे तीन मंदिर मिळून बनलेले आहे. मुख्यमंदिराचे शिखर, म्हणजेच पूर्वेकडील मंदिराचे शिखर आणि दक्षिणेकडील मंदिरांच्या शिखराचे भाग अद्याप टिकून आहेत. परंतु उत्तरेकडील मंदिराची रचना अंबरनाथ येथील मंदिराप्रमाणे असलेली दिसून येते. त्यानुसार तीन मंदिराचा समुह असलेले व एक अर्धमंडप असलेले हे शिवमंदीर आहे. प्रमुख मंदिराच्या गर्भगृहात शिवलिंग आहेत. समोर मंडपात नंदीच्या मूर्त्या आहे. या मंदिराचे छत अंबरनाथ येथील मंदिराच्या छताप्रमाणेच आहे.[12] मंदिराच्या छतावर कोरीव नक्षीकाम केलेले आहे. या मंदिराचा मध्यभाग मोठ्या घुमुटाचा बनलेला आहे. त्याचबरोबर

मंदिराच्या बाहेरील भितींवर देखील नक्षीकाम केलेले आहे.[13] मंदिराच्या बाहेरील भितींवर देवदेवतांच्या अतिशय सुरेख मूर्त्या कोरलेल्या आहेत. त्यात प्रामुख्याने त्रिविक्रम, भैरव, शिवतांडव नृत्यकरणाज्या शिवाची मूर्ती, पार्वती महिसासुर मर्दिनी अशा विविध प्रकारच्या मूर्ती आढळतात.[14]

बलसाणे येथील मंदिराचा ताराकृती आकार हा वाघोली येथील मुथई देवी मंदीराप्रमाणे आहे. बलसाणे येथील सर्व मंदिरे ही एका □ाळात बांधलेली नाहीत. दोन मंदिराचा काळ अगोदरचा वाटतो.[15] त्या मंदिरामध्ये मंदिर क्रमांक 1 व मंदिर □मां□ 5 ही मंदिरे मंदिर □मां□ 2 आणि मंदिर क्रमांक 3 ह्या मंदिरापेक्षा पन्नास वर्षापूर्वीची आहेत.[16] या मंदिरांची रचना विचारात घेतल्यास असे दिसून येते की, मंदिरांची रचना चांदणीच्या आकारासार□ी आहे. मंदिरांच्या गाभाज्यात मोठे शिवलिंग असून मागील भितींच्या कमानीखालील भागात पार्वती या देवतेची मूर्ती आहे. सभामंडपाचे छत्र पडक्या अवस्थेत असून पाषाणस्तंभ मात्र जागेवरच आहे. या मंदिर परिसरातील पूर्वेकडील मंदिरामध्ये वेगळ्या पद्धतीची रचना असलेले मंदिर आहे. मंडपाचे छत मध्यभागी असलेल्या स्तंभावर आधारलेले आहे. मुख्य मंदिरात विष्णूची मूर्ती असून मंडपाभोवती विष्णू देवतेच्या दहा अवताराच्या मूर्त्या आहेत. मुख्य मंदिरात घोडेस्वराची मूर्ती असून ती बहूदा कल्की अवताराची असावी.[17] मध्य गर्भगृहात आणि मंडपाला लागून असलेल्या दालनातील विष्णूमूर्तीमुळे विद्वान मंडळीनी या मंदिराला 'दशावतार मंदिर' म्हणून संबोधलेले आहे.[18]

मठ :- बळसाण्याच्या दोन्ही मंदीर समुहापासुन थोड्या अंतरावर उत्तरपूर्वेला चौकानाकृती स्वरुपाची इमारत असून त्या इमारतीच्या दरवाजावर एक शिलालेख आहे. त्यावरुन ती इमारत पुरोहित व पंडितांची निवासस्थाने असलेला मठ असावा. मोठा चौकोनाकृती मंडप आणि चार स्तंभाच्या आधारावर असलेले मंडपाचे छत इत्यादी मिळून तो मठ बनलेला आहे. व्हरांड्यातील दरवाजा मात्र मोडकळीस आलेला आहे. बाहेरुन अत्यंत साधी रचना, आतील भागात कोणतीही नक्षी काम नाही.[19] या मंदिरातील शिलालेखानुसार या मंदिर समुहातील मठ ही वास्तू पंडित श्री महाळूका यांनी पुन्हा बांधली आहे.[20] अमरकोशातील व्याख्येनुसार 'मठ' म्हणजे छात्र वैगेरेच निवासस्थान, सामान्यतः सन्याशी वृत्तीने राहणारे, उदा. ब्रह्मचारी, साधू स्त्री-पुरुष यांचे वास्तव्य रहात असे.[21]

बलसा□ परिसरातील मंदीराची वैशीष्ट्ये आपणास पुढीलप्रमाणे नमूद करता येतील.[22]

- तिन मंदीरांचे मंदीर
- मंडप
- शिव, विष्णू, पार्वती देवतांना वाहिलेले मंदिर
- मंदीरात शिवलिंग
- दशावतार मंदिर
- दरवाज्यावरील भागात गणेशमूर्ती
- नक्षीकाम केलेली दरवाजे
- देवतांच्या मूर्तीबरोबर, हत्ती, सिंह, नृत्यकरणाज्या स्त्रिया, गंगा-यमूना इत्यादींच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत.

मंडप : या परिसरातील मंदिराचे दूसरे वैशिष्ट्ये म्हणजे चौकोनी आकाराचे मंडप होय.

स्तंभ : या परिसरातील मंदिराच्या आधारस्तंभाचे तीन प्रकारात वर्गीकरण करता येईल.

पहिला प्र□ार 1. चौकोनी आकाराचा आधारस्तंभ.

दुसरा प्र□ार 2. अष्टकोनी आकार असलेले स्तंभ.

तर तिसज्या प्रकारात वरचा भाग अष्टीश्रा असलेले स्तंभ प्रकारात मोडतात.

मंदिराचे शिखर : अंबरनाथ येथील मंदिराच्या शिखराप्रमाणे बलसाणे परिसरातील मंदिरांची शिखर रचना असलेली दिसून येते.

अशा रितीने खानदेशातील बलसाणे परिसरात प्राचीन मंदीरांचा समूह आपणास पहावयास मिळतो. अशा या शिव व विष्णू देवतांना एकाच ठिकाणी मंदिरांच्या रुपाने असणारे शिल्प व संपन्न कलावैभवाचे स्वरुप असणाज्या या मंदिराचा समुह काळाच्या ओघात नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. आपण सर्वांनी एकदा तरी या परिसराला भेट द्यावी आणि या मंदीरांचे वैभव पहावे.

संदर्भ -

1) □ुळकर्णी अ.रा. - मध्ययुगीन महाराष्ट्र, पुणे, 2011, पान नं. 235.
2) जगताप पी.डी. - खानदेशचा इतिहास, जळगांव - 1997.
3)पाटील भि.-ना. - खानदेशातील समाजप्रबोधनाची चळवळ (1900 - 1950) प्रथमावृत्ती, 2005, पा-न -नं. 02.

4)द्र प्रभा र - मंदिर स्थापन्याचा इतिहास, नागपूर 2010,
5)उपरोक्त
6)उपरोक्त
7)धाये राजेंद्र, माने राजाराम, अंबड परिसरातील यादवकालीन मंदिर व बाख स्थापत्य (मराठवाडा इतिहास परिषद, औरंगाबाद), इतिहास संशोधन पत्रिका, अंक विसावा- 2015) पा.-नं. 40.
8)उपरोक्त
9)अहिररराव प्र.रा., खानदेशातील मंदिरे, खानदेशचा इतिहास (सं.) जगताप पी.डी., जळगाव, 1997, पान नं. 182.
10) डॉ. महाजन टी.टी. - प्राचीन खानदेशचा इतिहास, पुणे, 2005 पान नं. 296, 297,298.
11) उपरोक्त , अहिरराव प्र.रा., पान नं. 143
12) उपरोक्त, महाजन टी.टी.
13) उपरोक्त
14)उपरोक्त , अहिरराव प्र.रा., पान नं. 143
15)उपरोक्त
16) उपरोक्त, महाजन टी.टी.
17)उपरोक्त
18)पाठक अ.शं., (संपादक), महाराष्ट्र, इतिहास काळ खंड 1- भा -2, मुंबई- 2009, पा-न -नं. 158.
19)उपरोक्त
20) उपरोक्त , अहिरराव प्र.रा.
21)उपरोक्त, पाठक अ.शं., पान नं. 223 (खंड 1, भाग 2)
22)उपरोक्त, महाजन टी.टी.

Baviskar Anil Vitthal
Assistant Professor, Dept Of History,
V.V.M Arts & Commerce college, Akkalkua Dist. Nandurbar.